दिनांक 31/07/2025 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 75

विषय – सर्व्हे नं. 808/2, नवीन 422/2 मधुन गेलेला नियोजित 9 मी. रुंदींचा रस्ता हा सर्व्हे नं. 808/2 नवीन 422/2 व सर्व्हे नं. 809 नवीन 423 अशा दोन्ही सर्व्हे नंबर मधून अस्तित्वात असलेल्या रोडवर शिफ्ट करणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- 1) मा.मुख्याधिकारी यांनी सहा.नगररचनाकार यांची दिनांक 07/05/2025 रोजी मंजूर केलेली टिपणी.

2) अर्जदार यांनी या कार्यालयाकडे सादर केलेला दिनांक 06/02/2025 रोजीचा अर्ज

3) नगरपरिषदेने जा क्रं.5369 दि. 24/01/2019 रोजी मंजूर केलेला अंतिम रेखांकन प्रस्ताव

नगरपरिषद हददीतील श्री. वीरसिंह फत्तेसिंह पाटील रा.भोसलेनगर, पुणे. यांनी दिनांक 06/02/2025 रोजी न.प. हददीतील सर्व्हे नं. 808/2, नवीन 422/2 मधुन गेलेला नियोजित 9 मी. रुंदींचा रस्ता हा जुना सर्व्हें नं. 808/2 त्याचा नवीन सर्व्हें न. 422/2 व जुना सर्व्हें नं. 809 व त्याचा नवीन सर्व्हें न. 423 अशा दोन्ही सर्व्हे नंबर मधून अस्तित्वात असलेल्या रोडवर शिफ्ट करून मिळणेबाबत प्रस्ताव सादर केला आहे. सध्या वरील दोन्ही गटांच्या हद्दीवरून सदरचा 9 मीटर रुंदीचा रस्ता अस्तित्वात असून तो वहीवाटीत आहे व याच अस्तित्वात असलेल्या हद्दीवरील रस्त्यावरून जुना सर्व्हे नं. 809 व त्याचा नवीन सर्व्हे नं 423 मध्ये संदर्भ क्र 3 ने अंतिम रेखांकन मंजूर करण्यात आलेला आहे.

सध्याच्या मंजुर विकास आराखड्यानुसार प्रस्तावित रस्ता जागेवर अस्तित्वात नाही व त्याचे संपादन हि नियोजन प्राधिकरणाने अद्याप केलेले नाही. प्रस्तावित रस्त्यामध्ये अर्जदार यांचे क्षेत्र बाधित होत असल्यामुळे अर्जदार यांनी रस्ता सध्याचा वहिवाटीवर शिफ्ट होणे बाबत मागणी केली आहे. तसेच नव्याने प्रस्तावित रस्त्याचा नकाशा सादर केला आहे. सादर केलेल्या नकाशानुसार रस्ता करुन दिलेस त्यासाठी लागणारी जागा TDR च्या मोबदल्यात देणेस तयार असलेचे अर्जदार यांनी कळविले आहे. याबाबत एकत्रीकृत विकास आणि नियंत्रण नियमावली 2020 मधील तरतुद क्रं.3.11 नुसार कार्यवाही होणे अपेक्षित आहे. तरी सर्व्हे नं. 808/2, नवीन 422/2 मधुन गेलेला नियोजित 9 मी. रुंदींचा रस्ता हा सर्व्हे नं. 808/2 नवीन 422/2 व सर्व्हे नं. 809 नवीन 423 अशा दोन्ही सर्व्हे नंबर मधून अस्तित्वात असलेल्या रोडवर शिफ्ट करणेबाबत मा.सहसंचालक नगररचना पुणे यांचेकडे प्रस्ताव सादर करणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 31/07/2025 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 76

विषय – विटा शहर दुसरी सुधारित विकास योजना मधील सि.स.नं 2761, 2762 व 2769 मधील 24 मी रुंदीचा रस्ता वगळणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37 अन्वये फेरबदल करणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- 1) मा.मुख्याधिकारी यांनी सहायक नगररचनाकार यांची दिनांक 09/06/2025 रोजी मंजूर केलेली टिपणी.

2) कार्यकारी संचालक, सागरेश्वर सहकारी सूतगिरणी, मर्या, कडेगाव यांनी दि. 07/08/2024 रोजी 24 मी रस्त्याचे आरक्षण कमी करणेबाबत दिलेला अर्ज

विटा शहर मंजूर विकास योजना (दुसरी सुधारित) ही TPS-2009/1138/CR-1964/09/UD-13 दिनांक 31/08/2009 पासून अंमलात आलेली आहे. त्यानुसार सि.स.नं. 2761.2762 व 2769 मध्ये 24 मी रुंदीचा विकास योजना रस्ता प्रस्तावित आहे. सदर प्रस्तावित रस्ता वगळणेबाबत सागरेश्वर सहकारी सूतगिरणी, मर्या. कडेगाव यांनी दि.07/08/2024 रोजी 24 मी रस्त्याचे आरक्षण कमी करून 6.5 मीटर करणेबाबत अर्ज दिला होता. सदर 6.5 मी रस्ता अर्जदार यांनी स्वत:च्या जागेमधून नागरिकांच्या वहिवाटीसाठी नगरपरिषदेस विनामोबदला लिहून दिलेला आहे. त्यानुसार नगरपरिषदेने प्रशासकीय ठराव नं.59 दि. 18/09/2024 रोजी सदर जागेचे गौण फेरफारास मंजूरी दिलेली आहे. त्यानुसार सदरचे गौण फेरफारास महाराष्ट्र शासन राजपत्र दि 04/10/2024 रोजी व दै. सकाळ या वृत्तपत्रात दि. 26/12/2024 व दै. पुण्यनगरी या वृत्तपत्रात दि. 28/12/2024 ने प्रसिद्धीसाठी दिले होते. तसेच सर्व बाधित लोकांना नोटीसा देऊन सूचना व हरकती मागिवणेत आलेल्या होत्या. त्यानुसार मुदतीत श्री. दिगंबर बबन देशमुख यांनी दि. 15/01/2025 रोजी हरकत दाखल केली होती. तदनंतर नगरपरिषदेने दि. 09/05/2025 रोजी हरकतीवर सुनावणी घेतली असून आलेल्या सूचना हरकती व घेतलेल्या सुनावणीचे इत्तीवृत्तासह सदर प्रस्ताव शासनाला सादर करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37 (1) अन्वये शासनाला सादर करणेपुर्वी उक्त फेरबदलास अंतिम मंजुरी घेणे गरजेचे आहे. तरी विटा शहर दुसरी सुधारित विकास योजना मधील सि.स.नं 2761, 2762 व 2769 मधील 24 मी रुंदीचा रस्ता वगळणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37 अन्वये फेरबदल करणेस मंजूरी देत आहे.तसेच सदरचा प्रस्ताव शासनाकडे सादर करणेत यावा. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा